**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 7.328**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.11 No.4** **March – April 2024**

# स्त्रियांच्या कथेतील पुरूषी मानसिकतेचे चित्रण

**डॉ. विठ्ठल नामदेव रोटे**
*मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय, बोरगाव ता. वाळवा, जि . सांगली*
*Corresponding Author - डॉ. विठ्ठल नामदेव रोटे*
**DOI - 10.5281/zenodo.10873291**

**प्रस्तावना :**

*१९९० नंतरच्या स्त्रियांच्या कथालेखनात स्त्रीवादी विचार येत असला तरी काही लेखिका पुरुषांना केंद्रीभूत ठेऊन लेखन करताना दिसतात. स्त्रियांच्यावर आधुनीक विचारांचा प्रभाव असला तरी अजूनही काही स्त्रिया पुरुषप्रधानतेच्या साच्यात अडकलेल्या आहेत. पुरूषी हक्क स्त्रीयांवर अजूनही आहेत. मिळवत्या किंवा आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी असलेली स्त्री सुध्दा काही वेळेला पुरुषांच्या दबावाखाली पिचलेली दिसते. अशा स्त्रियांचे चित्रण काही कथांतून पहायला मिळते. स्त्रीवाद म्हणताना पुरूषांच्या मानसिकतेकडेही दुर्लक्ष झालेले दिसते. प्रत्येक पुरुषाकडे पुरूषांच्या अहंकारातून न पाहता पुरुषांच्या काही समस्या आहेत तेही अभ्यासणे आवश्यक ठरते. म्हणजेच १९९० नंतरच्या स्त्रियांच्या कथेत पुरूषकेंद्री कथाही पहायला मिळतात.*

**पुरूषी मानसिकतेचे चित्रण :**

प्रिया तेंडुलकरांच्या 'जाणे' कथेतील बाप आपल्या तरूण मुलांच्या मृत्युने हतबल झालेला दिसतो. आपल्या मुलाच्या जन्माने सुखावलेपण, आपल्या समोर दिवसेंदिवस मोठा होत असलेल्या मुलाच्या अपघाती मृत्युने हतबल होतो. मुलाच्या जन्माचा आनंद पचविणारा बाप मुलाच्या मृत्यूचे सत्य पचविताना पहायला मिळतो. 'भाजीपाला' या प्रिया तेंडुलकरांच्या कथेतील देव गोखले आपल्या पत्नीवर अधिकार गाजवितो. त्याची पत्नी त्यांच्या बरोबरच्या संसारात सुखी नाही. कारण देवच्या आवडी निवडी व तिच्या आवडी निवडी वेगळ्या आहेत. तर देवला आपल्या पत्नीने नोकरी केलेली आवडत नाही. तिने मुलांना जन्म दयावा, घराची जबाबदारी घ्यावी असे देवला वाटते. पुरूषी वर्चस्व ठेवणारा देव या कथेत पहायला मिळतो.

प्रिया तेंडुलकरांच्या या कथेत 'तो' नायिकेचा प्रियकर आहे. नायिकेनेच त्याला आपला भावी पती म्हणून निवडला आहे. म्हणून तो तिच्यावर पुरूषी हक्क बजावतो. तो चित्रकार असूनही काही काम करीत नाही. उलट तिच्याच पैशावर मौज करतो. तिच्याशी लग्नाअगोदर संबंध ठेवतो. तिने मानले नाही तर लग्न करण्यास नकार देतो. पुरुषी वृत्ती असणारा 'तो' प्रिया तेंडूलकर चित्रीत करतात.

प्रिया तेंडुलकरांची 'अनुची आई' या कथेतील प्रभाकर आपल्यापेक्षा वयाने लहान लताशी लग्न करतो. प्रेम विवाह करतो. पण मुलीच्या जन्मानंतर मात्र तो लतापासून एकटा वेगळा राहतो. त्याच्या मते लतामध्ये स्त्रीपणा आलेला नाही. त्यामुळे आपली बरीच वर्ष फुकट गेली असे वाटते. पण तो मुलीची जबाबदारी स्वीकारतो. तिच्या खर्चासाठी पैसे देतो. तिला फिरायला, तिच्या आवडी निवडी पूर्ण करतो. तिच्याशी मित्रासारखे वागतो. बऱ्याच दिवसांनी प्रभाकर लताकडे येतो व तिच्याशी नकळत संबंध ठेवतो. पत्नीपेक्षा आपण प्रौढ झालो याची जाणीव झालेल्या प्रभाकरचे चित्रण प्रिया तेंडुलकर करतात.

प्रिया तेंडुलकरांच्या 'बायको' कथेतील सुधीर देशमुख पुरुषप्रधान संस्कृतीतील आहे. आपल्यापेक्षा मोठ्या पदावर काम करणारी, सुशिक्षित पत्नीला तो आपले पाय चेपायला सांगतो. एवढेच नाही तर दारूचा ग्लास तिच्या ओठांना लावून द्यायला सांगतो. स्वाभिमानी नंदिनी मात्र सुधीरला सोडून जाते. पण नंदिनीचा मृत्यू होतो. आपल्या पत्नीवर आपण केलेला अन्याय सुधीरला जाणवतो व तिच्या मृत्युने मात्र पश्याताप होतो. पुरुषप्रधान संस्कृतीतील व पत्नीचे यश पचवू न शकणारा सुधीर प्रिया तेंडुलकर चित्रीत करतात. 'तिच्या लग्नाच्या शोक सभेची रात्र' या प्रिया तेंडुलकरांच्या कथेतील आनंद व्यसनी आहे. दुसऱ्या स्त्रीबरोबर संबंध ठेऊन आहे. आर्थिक संकटात असलेल्या आपल्या पत्नीला सोडून निघून जातो, उलट पत्नीचे घर दुसऱ्या स्त्रीच्या ताब्यात देऊन तिच्याकडून पैसे घेतो. बाहेरख्याला असणाऱ्या आनंदाचे चित्रण प्रिया तेंडुलकर करतात.

सानियांच्या काही कथेत पुरुषांच्या मानसिकतेचा विचार येतो. सानियांच्या कथेतील पुरूष वाईट नाहीत. तर काही प्रसंगानी त्या पुरूषांचे चांगले वाईट गुण आपल्याला पहायला मिळतात. सानियांच्या 'भूमिका' या कथेतील श्रीरंगाला त्याची पत्नी प्रौढ वयात आपल्यावर बाळंतपण लादले म्हणून दोष देते. यात श्रीरंगाचा काही दोष नाही. पत्नीचा बाळंतपणात मृत्यु झाल्यावर श्रीरंग दुसऱ्या लग्नाचा विचार करतो. यात त्याचा स्वार्थ नाही. पण आपल्या मुलांना सांभाळ करणारी स्त्री हवी म्हणून तो विचार करतो. त्याची मैत्रीण वसू त्याला लग्नाला नकार देते. परिस्थितीच्या कचाटयात सापडलेल्या श्रीरंगचे चित्रण सानिया करतात. 'वारसा' कथेतील मिलींद राजकारणी घरातील आहे. अविवाहीत असणारा मिलींद राजकारणात येऊन वेगळे काहीतरी करण्याचा निर्णय घेतो. त्याला समाजकारणही करायचे आहे. भ्रष्ट, फसव्या जगात आपले अस्तित्व शोधण्याचा प्रयत्न करणाऱ्या मिलींदचे चित्रण सानिया करतात. "आपापले प्रश्न' या सानियाच्या कथेतील मकरंद आपल्या पत्नीपासून दूर आहे. त्याची आजारी मुलगी त्याच्याजवळ आहे. तो नोकरी करत नाही. बेकारीतच जीवन जगतो. घरचेही त्याच्याकडे दुर्लक्ष करतात. तेंव्हा आजारी मुलीला घेऊन तो आपली मैत्रीण वैजयंताकडे येतो. तिच्याकडे तो आश्रीतच म्हणून राहतो. 'धागा' या सानियांच्या कथेतील डॉ. वेदांतराव प्रसिध्द शास्त्रज्ञ आहे. आपल्या

नातेवाईकापासून अलिप्त, त्यांच्याशी त्याचं काही देणं घेणं नाही. इतरांशी अलिप्त राहणाऱ्या वेदांतनेच आपल्या पत्नीला जाळून मारले असा नातेवाईकांचा आरोप आहे. तर वेदांत त्याकडे दुर्लक्ष करतो. आपले काम व घर यापलीकडे तो जात नाही. अलिप्ततावादी वेदांतचे चित्रण सानिया करतात.

नीरजांच्या काही कथांतून पुरुषांचे चित्रण येते. 'पुनरपि मरणम' या कथेतील सडेकर विधवा रोहिणीबरोबर लग्न करतो. मुलांना जन्म न देण्याच्या अटीवर रोहिणी लग्न करते. पण सडेकरला स्वतःचे मुल हवे असते . म्हणून रोहिणीला माराहण करतो. नैराश्येत आत्महत्या करतो. पुरूषप्रधानतेचा एक धागा म्हणून सडेकरकडे पाहता येईल. नीरजांच्या 'चौकट' कथेतील विवेक पुरुषी अहंकाराचा नमुना आहे. आपल्या पत्नीने आपल्या मित्राच्या पत्नी सारखे दिसावे, वागावे असे त्याला वाटते. शिपवर नोकरीला असणारा विवेक दोन तीन महिन्यानी घरी येतो. त्यावेळी त्याच्यातील पुरूषी आक्रमता त्याच्या पत्नीला जाणवते. प्रेमापेक्षा अधिकार जाणवतो. आपल्या मुलीने पत्नीसारखे न होता मित्राच्या पत्नी सारखे व्हावे अशी त्याची इच्छा आहे. पुरुष प्रधानतेचा एक घटक म्हणून विवेककडे पहाता येईल. नीरजांच्या 'पन्नासावा वाढदिवस असाही' या कथेतील सदानंद मानकर कवी आहे. सदानंदचा दोनवेळा प्रेमभंग झालेला आहे. पन्नाशी गाठलेला सदानंदचे लग्न होत नाही. म्हणून तो पन्नासावा वाढदिवस साजरा करण्यासाठी लक्ष्मी नावाच्या वेश्येकडे जातो. तिच्याकडे आपले मन मोकळे करतो. स्त्री सहवासासाठी आसुसलेला सदानंद या कथेत येतो. नीरजांच्या 'गुरूचरित' कथेतील गुरू नावाच्या नायकाचे आईवर नितांत प्रेम आहे. पण पत्नीवर मनापासून प्रेम करीत नाही. आईवर त्याची प्रचंड निष्ठा आहे. पण पत्नीवर नाही. आपल्या पत्नीने फक्त शय्यासोबत करावी. परंपरागत बाईपण स्वीकारून निमुटपणे सर्वाची सेवा सुश्रुषा करावी, नवऱ्याचा मानपान राखावा. त्याच्यावर कोणतीच बंधने नकोत. मुलांबाळांची जबाबदारी नको. पत्नीनेच त्या स्वीकाराव्या अशा मानसिकतेत असणारा, पुरुषप्रधान व्यवस्थेचा घटक असणाऱ्या गुरूचे चित्रण नीरजा करतात. नीरजांच्या 'मडकं गेलं वाहून' या कथेतील अवधूत नवरेशाही गाजवणारा पुरूष प्रतिनिधी आहे. आपल्या पत्नीकडे संशयाने पाहणारा हा पती आहे. लग्नाअगोदरचे प्रेम बाजूला सारून तो पत्नीकडे संशयाने पहातो. पत्नी जिकडे जाईल तिकडे तो संशयानेच पाहतो. मुंबईला पुराने वेढलं असताना अवधूत पत्नीच्या मदतीला न येता ऑफिसमध्ये पत्याने खेळण्यात रमतो . उलट ती कोठे आहे, कुणाबरोबर आहे असे तिला प्रश्न विचारतो. संशयी, मतलबी, पुरूषी मनोवृत्तीच्या अवधूतचे चित्रण नीरजा करतात.

मोनिका गजेंद्रगडकरांच्या 'नाळ' कथेतील आण्णा (श्रीपाद) पुरूषीवृत्तीचे आहेत. आपल्या पत्नीवर सुमित्रावर खरे खुरे प्रेम न करता आपल्याला हवे तेंव्हा तिचे शरीर हवे अशी अपेक्षा करणारे आहेत. तिच्या आवडी निवडी पूर्ण न करता कधीही कोणत्याही वेळी तिने आपल्याला शरीर सुख दयावे हीच अपेक्षा ठेवतात. आण्णांच्या मित्राबरोबर

सुमित्रा घर सोडून गेल्यानंतरही ते तिला फक्त शरीर गरजेसाठी परत आणतात. तर आण्णांचाभाऊ रघू हाही स्त्रीजातीवर चिडतो. एकूणच दोघांच्यात ही पूरुषी अहंकार जास्त दिसतो.

मेघना पेठेंच्या कथेतील पुरुषपात्रे परिस्थितीच्या कचाट्यात सापडलेली आहेत. 'होआवे लागे' या कथेतील गिझरे व वर्तक ही पात्रे पुरूष केंद्री आहे. गिझरे लहानपणापासून अपंग आहे. नोकरी करतो पण अविवाहीत आहे. तर वर्तक पन्नाशीकडे झुकलेले असून पत्नीसुख त्यांना मिळत नाही. म्हणून आपल्यापेक्षा वयाने खुप लहान केसकर बरोबर संबंध ठेवतात. तिच्याशी संबंध ठेऊनही ते गिझरेला केसकरबरोबर लग्न करायला सांगतात. 'सीसॉ' या मेघना पेढेंच्या कथेतील नाना पुरुषप्रधानतेचा एक घटक आहेत. नाना आपल्या पत्नीला प्रेमाने वागवित नाहीत. उलट तिचा छळच करतात. तिला कोणताच अधिकार देत नाहीत. मुलाला आशुतोषला आपल्या अधिकारात ठेवतात. आपल्या मुलाला टेनिसचे रॅकेट घेऊन देणाऱ्या पत्नीचा अपमान करतात. तर आशुतोषला त्याच्या चुकीच्या वेळी शिक्षा करतात, मारतात. पण आशुतोष परदेशात गेल्यावर नाना आजारी पडतात. त्यावेळी नानांची सुश्रुषा त्यांची पत्नीच मनाविरूध्द करते. नेहमी आपल्या अहंकारात राहणारे नाना आजारपणात हतबल होताना दिसतात. मेघना पेठेंच्या 'छाया-माया-काया' या कथेतील विभाचे वडील लालमावशीशी विवाहबाह्य संबंध ठेवतात. पण आपल्या मुलीशी कौतुकाने, प्रेमळपणाने वागतात. पण पत्नीला आपले संबंध सांगितल्याने पत्नीच्या प्रेमाला पारखे व्हावे लागते. तर विभाचा नवरा नागेश हाही आपल्या मानलेल्या बहिणी बरोबर संबंध ठेवतो. नागेश विभासाठी वेळ देत नाही. लग्नाच्या काही दिवसातच नागेश आपल्या मानलेल्या बहिणी बरोबर शारीरिक चाळे करताना विभा पाहते. नागेश बहिणीला परदेशात जाण्यास सोडून आल्यावर विभाची मासिक पाळी सुरू असतानाही तिच्याशी जबरदस्तीने संबंध ठेवतो. कधीही रात्री-अपरात्री येवून जातो. विभाला मनापासून पती सुख देत नाही. उलट ओरबडण्याची त्याची वृत्ती आहे. विभाचे गोड कौतुक नाही. पुरुषप्रधान संस्कृतीचा घटक म्हणून नागेश या कथेत येतो.

**समारोप :**

एकूणच प्रिया तेंडुलकर (जाणे, भाजीपाला, तुकडे, जन्मलेल्या प्रत्येकाला, अनुची आई, फर्टिलिटी क्लिनिक, नव्या कोऱ्या पांढऱ्या साडीचे एक टोक, घसरण, बायको, तिच्या लग्नाच्या शोकसभेची एक रात्र), सानिया (वारसा, आपापले प्रश्न, धागा), नीरजा (चौकट, पन्नासावा वाढदिवस असाही, गुरूचरित, मडकं गेलं वाहून), मोनिका गजेंद्रगडकर (नाळ), मेघना पेठे (होआवे लागे, सीसॉ, छाया माया काया) या कथांतून पुरुषांचे पुरूष प्रधान संस्कृतीशी असणारे नाते, त्यांचा अहंकार, पुरूषी वृत्ती व त्याचबरोबरीने त्यांच्यातील समंजस, चांगुलपणाही चित्रीत करतात.

**संदर्भ :**


१. सोमण, अंजली, साहित्य आणि सामाजिक संदर्भ, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९८९

२. नाईक शोभा, भारतीय संदर्भातून स्त्रीवाद-स्त्रीवादी समीक्षा आणि उपयोजन, लोकवाड्मय गृह, मुंबई, प्रथमावृत्ती, जून २००७

३. राजापुरे तापस, पुष्पलता १९८० (.संपा) नंतरचे स्त्रीनिर्मित कथनपर साहित्य, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्रथमावृत्ती, डिसेंबर २०१०